:जाहिर आवाहन:

:: गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ::

गोवंशाचा सांभाळ (भाकडगाई,अनुत्पादक / निरोपयोगी बैल,वळू,इ.) करण्यासाठी गोशाळांना अर्थसहाय्य देण्यासाठी राज्यस्तरीय योजने अंतर्गत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही नविन योजना दि.26 एप्रिल 2017 च्या शासन निर्णयान्वये राज्यात राबविण्यांस शासनाने मान्यता दिलेली असुन सन 2017-18 या आर्थिक वर्षात राबविण्यांत येत आहे.या क्षेत्रात अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थेमार्फत ही योजना राबविण्यांत येणार आहे.सदरची संस्था ही धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असावी तसेच संस्थेस गोवंश संगोपनाचा कमीतकमी 3 वर्षांचा अनुभव असावा.केंद्रावर असलेल्या पशुधनास आवश्यक असलेली वैरण/चारा उत्पादनासाठी तसेच पशुधन संगोपनासाठी संस्थेकडे स्वतःच्या मालकीची अथवा 30 वर्षांच्या भाडेपट्टयावरची किमान 15 एकर जमीन असावी.सदर योजने अंतर्गत अनुदानाची रक्कम रु.1 कोटी असुन संस्थेने या योजने अंतर्गत मागणी केलेल्या एकुण अनुदानाच्या कमीतकमी 10 टक्के एवढे खेळते भाग भांडवल संस्थेकडे असणे आवश्यक आहे.या शिवाय इतर अटी/शर्ती सदर शासन निर्णयात नमुद केल्या असुन सदर शासन निर्णय व अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती (संबंधित) यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. इच्छुक स्वंयसेवी संस्थांनी पंचायत समिती मार्फत दि.31.08.2017 पुर्वी स्वयंपुर्ण प्रस्ताव जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,परभणी या कार्यालयास सादर करावेत.

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत लाभार्थी गोशाळांची निवड आणि अनुदान द्यावयाच्या आराखडयास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मा.मंत्री (पदुम) यांचे अध्यक्षतेखालील राज्य स्तरावरील समितीस असणार आहे.

तेंव्हा या क्षेत्रात अनुभव असलेल्या इच्छुक स्वंयसेवी संस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त परभणी यांनी केले आहे.

राज्यस्तरीय योजनेंतर्गत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही नवीन योजना सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पविआ-२०१६/प्र.क्र.११४/पदुम-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २६ एप्रिल, २०१७

प्रस्तावना :-

राज्यात दि.४ मार्च, २०१५ पासून महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार संपूर्ण गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीवर प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्यामुळे शेतकामासाठी, ओझी वाहण्यासाठी व पैदाशीसाठी उपयुक्त नसलेले गोवंशीय बैल व वळू यांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच, गाय, बैल, वळू यांच्या कत्तलीसाठी परराज्यात करावयाची वाहतूक व तदनुषंगीक खरेदी / विक्री करण्यास देखील प्रतीबंध करण्यात आलेला आहे. परिणामी, कालांतराने शेती व दूध यासाठी अनुत्पादक असलेल्या गोवंशीय पशुधनाच्या संख्येत वाढ होणार असून, या सर्व पशुधनाचा सांभाळ / संगोपन करणे आवश्यक ठरणार आहे.

२. मा. मंत्री (वित्त) यांनी सन २०१६-१७ चा अर्थसंकल्प विधीमंडळात सादर करतांना दि. १८ मार्च, २०१६ रोजी गोवर्धन गोवंश सेवा केंद्र सुरू करण्याची घोषणा केलेली असून, ती खालील प्रमाणे आहे.

"महाराष्ट्रातील ३४ ग्रामीण जिल्ह्यांमध्ये भाकड गाई व गोवंश संगोपनासाठी मी "गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र" ही नवीन योजना जाहीर करत असून, या क्षेत्रात अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थांमार्फत ही योजना राबविली जाईल. यासाठी, अशा संस्थांना एकरकमी १ कोटी रुपये अनुदान देण्यात येईल. तसेच, त्याठिकाणी उपलब्ध असल्यास आवश्यकतेनुसार शासकीय जमिन देण्यात येईल. या गोवर्धन गोवंश रक्षा केंद्रासाठी सन २०१६-१७ करीता ३४ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे."

३. राज्यस्तरीय योजनेअंतर्गत **गोवर्धन गोवंश सेवा केंद्र** ही नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ ग्रामीण जिल्ह्यात राबविण्यासाठी दिनांक- ६ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर योजना राज्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

४. गोवंशाचा सांभाळ (भाकड गाई, अनुत्पादक / निरुपयोगी बैल, वळू इ.) करण्यासाठी गोशाळांना अर्थसहाय्य देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेअंतर्गत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरीत ३४ ग्रामीण जिल्ह्यात राबविण्यासाठी याद्वारे शासन मान्यता देत आहे.

५. योजनेचे उद्देश :-

अ) दुग्धोत्पादनास, शेतीकामास, पशु-पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या / असलेल्या गाय, वळू, बैल गोवंश यांचा सांभाळ करणे.

ब) अशा पशुधनासाठी चारा, पाणी व निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन देणे.

क) गोवर्धन गोवंश सेवा केंद्रामधील पशुधनासाठी आवश्यक असलेल्या वैरणीसाठी वैरण उत्पादन कार्यक्रम राबविणे.

ड) गोमूत्र, शेण इ. पासून विविध उत्पादने, खत, गोबरगॅस व इतर उप-पदार्थांच्या निर्मितीस प्रोत्साहन व संशोधनास /चालना देणे.

६. लाभार्थी निवडीचे निकष / अटी व शर्ती :-

१. सदरची संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असावी.

२. संस्थेस गोवंश संगोपनाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा.

३. केंद्रावर असलेल्या पशुधनास आवश्यक असलेली वैरण / चारा उत्पादनासाठी तसेच पशुधन संगोपनासाठी संस्थेकडे स्वत:च्या मालकीची अथवा ३० वर्षाच्या भाडेपट्टयावरची किमान १५ एकर जमीन असावी.

४. संस्थेने या योजनेंतर्गत मागणी केलेल्या एकूण अनुदानाच्या कमीत कमी १० टक्के एवढे खेळते भाग-भांडवल संस्थेकडे असणे आवश्यक आहे.

५. संस्थेचे नजीकच्या मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले असणे आवश्यक आहे.

६. संस्थेस गोसेवा / गो-पालनाचे कार्य करण्यासाठी शासनासोबत करारनामा करण्याचे बंधनकारक राहील.

७. संबंधीत संस्थेचे राष्ट्रीयकृत बॅकेत खाते असणे आवश्यक आहे.

८. संस्थेवर कार्यरत कर्मचारी / मजूर यांचे वेतन इत्यादीचा खर्च संस्थेकडून अदा करण्यासाठी संस्था आर्थिकदृष्टया सक्षम असावी.

९. या योजनेंतर्गत ज्या बाबीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल, त्याच बाबीसाठी भविष्यात नव्याने कोणतेही अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१०. ज्या संस्थांकडे पशुधनाच्या देखभालीसाठी व चाऱ्यासाठी स्वत:च्या उत्पनाचे साधन आहे, अशा संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

११. राज्यस्तरावरील समितीची पूर्वपरवानगी घेऊन केवळ नवीन मूलभूत सुविधा निर्माण करण्याकरिताच सदर योजनेत रु. १.०० कोटी इतके अनुदान अनुज्ञेय राहील.

१२. राज्यस्तरावरील समितीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय मूलभूत सुविधा निर्माण केल्यास, अशा बाबींसाठी सदर योजनेत अनुदान मंजूर करण्यात येणार नाही.

७. <u>या योजनेमध्ये प्रामुख्याने खालील मुलभूत सुविधांकरीता अनुदान देय ठरेल:-</u>

(अ) पशुधनासाठी नवीन शेडचे बांधकाम, चाऱ्याची, पिण्याची पाण्याची व्यवस्था व वैरण उत्पादनासाठी पाण्याच्या उपलब्धेकरिता विहीर / बोअरवेल, चारा कटाई करण्यासाठी विद्युतचलित कडबाकुट्टी यंत्र, मुरघास प्रकल्प, गांडूळखत निर्मिती प्रकल्प, गोमूत्र, शेण यापासून उत्पादन निर्मिती प्रकल्प व विक्री केंद्र इत्यादी, अशा प्रकारच्या मुलभूत सुविधांकरीता अनुदान देण्यात यावे. याकरिता संस्थांच्या प्रस्तावामध्ये वरील बाबींचा समावेश करण्यात यावा. जुन्या शेडच्या दुरूस्तीकरिता या योजनमधून अनुदान मिळणार नाही.

(ब) कृषि / पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हास्तरीय विविध योजनांमधून, चारा उत्पादनांच्या योजनामधून या गोशाळांना वैरण लागवडीसाठी बियाणे, खते, ठोंबे, हायड्रोपोनीक, वाळलेला चारा उत्पादन / ओला चारा उत्पादन करण्यासाठी लाभ अनुज्ञेय राहतील.

(क) तसेच विद्युत जोडणी आवश्यक असल्यास "कृषि / कृषिपंप" या बाबी अंतर्गत प्रचलित योजनेमधून या गोशाळांनी विद्युत जोडणी प्राप्त करुन घ्यावी. या लाभासाठी प्रस्तुत योजनेमधून अनुदान देय होणार नाही.

(ड) याशिवाय या गोशाळांनी रुग्ण पशुधनास आवश्यक असलेल्या पशुवैद्यकीय सेवा जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत उपलब्ध करुन घ्याव्यात.

८. <u>"गोवर्धन गोवंश सेवा केंद्र" या योजनेतंर्गत लाभार्थी गोशाळांची निवड</u> :-

या योजनेंतर्गत अनुदान द्यावयाच्या आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे आणि गोशाळेची निवड करण्याचे अधिकार राज्यस्तरावरील मा.मंत्री (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या खालील समितीस प्रदान करण्यात येत आहेत.

९. सदर समितीची संरचना खालीलप्रमाणे:-

(१) मा. मंत्री (पदुम)	अध्यक्ष
(२) प्रधान सचिव / सचिव (पदुम)	सदस्य
(३) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य
(४) प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी नामनिर्देशीत केलेला उपसचिवांपेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी	सदस्य

(५) प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव (नियोजन) यांनी नामनिर्देशीत केलेला उपसचिवांपेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी — सदस्य

(६) तीन अशासकीय सदस्य — सदस्य

(७) उप सचिव / सह सचिव (पशुसंवर्धन) — सदस्य सचिव

१०. सदर समितीवरील अशासकीय सदस्यांची नेमणूक शासनच्या मान्यतेने करण्यात येईल.

११. या योजनेतील बांधकाम, विद्युत्तीकरण, पाणीपुरवठ्यासाठी विहीर इत्यादी तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची मान्यता जिल्हास्तरावरील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घ्यावी.

१२. सदर योजनेची राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता उर्वरीत ३४ ग्रामीण जिल्ह्यांसाठी प्रति जिल्हा रु. १.०० कोटी एकरकमी अनावर्ती अनुदान या प्रमाणे ३४ जिल्ह्यांसाठी रु. ३४.०० कोटी एवढे अनुदान राज्यस्तरीय योजनेंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल.

१३. ही योजना वित्तीय वर्ष सन २०१७-१८ या वर्षापासून राबविण्यात येईल. ज्या संस्थेस सदर योजनेचा लाभ मिळालेला आहे, अशा संस्थेस भविष्यात या योजनेतून लाभ अनुज्ञेय होणार नाही.

१४. लाभार्थींनी या संदर्भातील प्रस्ताव संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे सादर करावा.

१५. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्राथमिक छाननी करुन, प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावा.

१६. आयुक्त पशुसंवर्धन यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह, प्रस्ताव राज्यस्तरीय समितीच्या मान्यता घेण्यासाठी शासनास सादर करावा.

१७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०४२६१७२२३५१५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विकास तु. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे- ७.

३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
१०.सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
११.सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
१२.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४.निवड नस्ती (पदुम- ३).

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी अर्ज

प्रती,

सचिव,
राज्यस्तरीय समिती, गोवर्धन गोवंश सेवा केंद्र तथा,
उपसचिव/सहसचिव (पशुसंवर्धन)
महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

विषय :- गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेबाबत..
मार्फ़त :- जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा: --------------

अर्जदार संस्थेचे नाव :-
पत्ता :-
दुरध्वनी क्र. :-
ई. मेल आयडी :-

मी, -- (नाव) राहणार ---, वरील नमुद संस्थेचा अध्यक्ष/सचिव असून, आमच्या संस्थेमार्फ़त गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी अर्ज सादर करीत आहे. आमची संस्था गेली ----- वर्षापासुन दुग्धोत्पादनास, शेतीकामास, पशु-पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या /असलेल्या गाय, वळू, बैल ई. प्राण्यांचा सांभाळ करीत आहे. तसेच अशा पशुधनासाठी चारा, पाणी व निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन देत आलेली आहे. आमची संस्था गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत विहित केलेल्या निकषामध्ये बसत असल्याने गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेबाबत अर्जाचा विचार व्हावा ही विनंती.

या अर्जासोबत जोडलेल्या “परीशीष्ट-अ, ब, क, ड” नुसार आवश्यक कागदपत्रे तसेच संस्थेचा वर्गीकरण अहवाल सोबत जोडला आहे. आमच्या संस्थेस शासनामर्फत आतापर्यंत कोणतीही आर्थिक मदत अथवा मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिलेली नाही.

या अर्जामध्ये सादर केलेली माहिती खोटी आढळुन आल्यास मी, वरील नमुद संस्थेचा अध्यक्ष/सचिव या नात्याने कारवाईस पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण — स्वाक्षरी
दिनांक — नाव

संस्थेचा शिक्का

“परीशीष्ट-अ”

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी आवश्यक कागदपत्रे

अ.क्र.	बाब	पृष्ट क्र.
१	गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी अर्ज	
२	संस्थेचे धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र	
३	संस्थेत गोवंश जोपासल्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असल्याची कागदपत्रे	
४	केंद्रावर असलेल्या पशुधनास आवश्यक असलेली वैरण / चारा उत्पादनासाठी तसेच पशुधनाचे संगोपनासाठी संस्थेकडे स्वत:च्या मालकीची अथवा ३० वर्षाच्या भाडेपट्टयावरची किमान १५ एकर जमीन असल्याची कागदपत्रे	
५	अनुदान रकमेच्या मागणी साठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या कमी १० टक्के इतके खेळते भाग भांडवल असल्याची कागदपत्रे	
६	संस्थेचा नजीकच्या कमीत कमी ३ वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल	
७	संस्थेस गोसेवा/गो-पालनाचे कार्य करण्यासाठी शपथपत्र परीशीष्ट-ड (शपथपत्र)	
८	संस्थेचे खाते राष्ट्रीयकृत बॅकेत असल्याची कागदपत्रे	
९	परीशीष्ट-ब (संस्थेची माहिती)	
१०	परीशीष्ट-क (अनुदान प्रस्तावाची अंदाजपत्रके)	
११	संस्थेचा वर्गीकरण अहवाल (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे स्वाक्षरीने)	

ठिकाण — स्वाक्षरी

दिनांक — नाव

संस्थेचा शिक्का

“परीशीष्ट-ब”

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी आवश्यक संस्थेची माहिती

अ.क्र.	बाब	माहिती
१	संस्थेचे नाव	
२	पत्ता	
३	दुरध्वनी क्र	
४	ई. मेल आयडी	
५	संस्थापक मंडळ माहिती	
६	संस्था स्थापनेचा दिनांक	
७	संस्था नोंदणीचा दिनांक	
८	संस्था स्थापनेचा मुळ उद्देश	
९	संस्थे कडे असलेली जनावरे	गायी-
		बैल / वळू
		गायींची वासरे
		म्हशी
		रेडे
		म्हशींची वासरे
		ईतर पशुधन
		एकुण पशुधन
१०	संस्थेकडे असलेली स्वतःची जमीन (एकर)	
११	संस्थेकडे असलेली भाडेपट्टी वरील जमीन (एकर)	
१२	संस्थेकडे चारा लागवडी करीता उपलब्ध असलेली जमीन (एकर)	

ठिकाण | स्वाक्षरी

दिनांक | नाव

संस्थेचा शिक्का

"परीशीष्ट-क"

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्तावाची अंदाजपत्रके

अ.क्र.	अनुदानाची बाब	प्रस्तावित रक्कम	अंदाजपत्रक पृष्ट क्र.
१	पशुधनासाठी नविन शेड बांधकाम		
२	चा-याची, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व वैरण उत्पादनासाठी विहीर/ बोअरवेल		
३	चारा कटाईसाठी विद्युतचलीत कडबाकुट्टी यंत्र		
४	मुरघास प्रकल्प		
५	गांडूळखत निर्मीती प्रकल्प		
६	गोमूत्र, शेण यापासून उत्पादन निर्मीती प्रकल्प व विक्री केंद्र		
७	ईतर सुविधा- (सविस्तर)		
	एकुण		

ठिकाण

दिनांक

स्वाक्षरी

नाव

संस्थेचा शिक्का

“परीशीष्ट-ड”

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत शपथपत्र

मी, --- (नाव) राहणार ---------------------------
-------------------------, वरील नमुद संस्थेचा अध्यक्ष/सचिव असुन, आमच्या संस्थेमार्फ़त गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी अर्ज सादर करीत आहे.

१) आमची संस्था गेली ----- वर्षापासुन दुग्धोत्पादनास, शेतीकामास, पशु-पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या /असलेल्या गाय, वळू, बैल ई. पशुधनाचा सांभाळ करीत आहे. तसेच अशा पशुधनासाठी चारा, पाणी व निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन देत आलेली आहे.
२) आमच्या संस्थेस शासनामर्फत आतापर्यंत कोणतीही आर्थिक मदत अथवा मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिलेली नाही.
३) संस्था गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजने अंतर्गत अनुदान प्राप्त झाल्यास त्याचा विनियोग मंजुर कामासाठी करण्यात येइल
४) संस्था शेतक-यांकडील शेतीकामास, पशु-पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या /असलेल्या /गाय, वळू, बैल ई. पशुधनाचा कायमस्वरुपी स्विकार व सांभाळ करीन.
५) संस्था महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ अन्वये वेळोवेळी पोलिस विभागा मार्फ़त जप्त केलेल्या सर्व गाय, वळू, बैल ई. पशुधनाचा कायमस्वरुपी स्विकार व सांभाळ करीन
६) संस्था महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ तसेच जनावरांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० च्या तरतुदींचे पुर्ण पालन करीन

मी सादर केलेली माहिती खोटी आढळुन आल्यास मी, वरील नमुद संस्थेचा अध्यक्ष/सचिव या नात्याने कारवाईस पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण स्वाक्षरी
दिनांक नाव

संस्थेचा शिक्का

१. साक्षीदार नाव स्वाक्षरी

२. साक्षीदार नाव स्वाक्षरी

Gaushala Survey Form

Name of Goshala: **Address:** **Phone:**

Sr.No.	Main Parameters	Sub Parameters	Options					Maximum Rating/Marks	Obtained Rating/Marks
1	Trust Registration	Registration Status	No	Yes					
			0	2				2	
2	Audit report	Years of Audit Reporting	1 Year	2 Years	3 Years				
			2	3	5			5	
3	Account in Nationalized Bank	Status	No	Yes					
			0	2				2	
4	Animals	No. of Animals	Below 200	200+	300+	500+			
			2	5	8	10		10	
		No. of Indigenous/Local Cows	Below 100	100+	200+	300+			
			2	5	8	10		10	
5	Accept seized animals	Status	No	Yes					
			0	5				5	
6	Shed size for animals	Area of Shed (in sq.ft)	Below 2000	2000+	5000+	8000+			
			1	2	3	5		5	
7	Land size	Area of Land	5-10 Hect	20-30 Hect	30-50 Hect	50-100 Hect	100+ Hect		
			2	5	8	12	20	20	
		Land Ownership	Govt Owned/leased	Private Rental	Private Owned				
			0	5	10			10	
8	Water source for drinking water	Source	Procured	Self owned					
			0	4				4	
		Water Storage Capacity (Litres)	Below 20000	20000+	30000+	50000+			
			1	2	3	4		4	
9	Fencing for Gaushala	Availability of Fencing	No	Yes					
			0	2				2	

10	Security provision	Security Guards provided	No	Yes					
			0	1				1	
11	Fodder source for animals	Fodder Source	Procured	Entirely Self produced					
			0	5				5	
12	Land for fodder & fodder production	Area of Land for fodder (in Acre)	Below 10	20+	30+	50+			
			2	4	6	10		10	
13	Fodder storage facility	Fodder Storage Availability	No	Yes					
			0	1				1	
		Silage Unit Availability	No	20% of fodder	50+ % of fodder				
			0	1	4			4	
		Availability of Hydroponics	No	Yes					
			0	2				2	
14	Biogas plant	Functioning Biogas Plant	No	Yes					
			0	3				3	
15	Cow Urine Products plant	Functioning Plant	No	Yes					
			0	3				3	
		Monthly Profit from cow urine	No	Yes					
			0	3				3	
16	Cow Dung Products plant	Functioning Plant	No	Yes					
			0	3				3	
		Monthly Profit from cow dung	No	Yes					
			0	3				3	
17	Laboratory for testing	Functioning Lab	No	Yes					
			0	2				2	
18	Veterinary aid facility	Type	Govt	Outsourced	Self employed				
			1	2	3			3	
19	Marketing/labeling of Products	Gaushala Products availablity in market	No	Yes					
			0	5				5	

		Means of Marketing	Not marketed	Home to Home	Public Stalls	Online			
			0	1	2	3		3	
20	Testing of animals for TB/JD/Brucellosis etc	Regular Testing performed	No	Yes					
			0	2				2	
21	Milk processing unit	Availability	No	Yes					
			0	3				3	
22	A I Facility	Availability	No	Yes					
			0	5				5	
23	Embryo Technology	Availability	No	Yes					
			0	5				5	
24	IVF Technology	Availability	No	Yes					
			0	5				5	
							Total	150	

Range of Marks	**Category**
More than 135	**A**
120-34	**B**
105-119	**C**
90-104	**D**
Below 90	**E**

This is to certify that I have inspected this Goshala and as per the observations the category allotted to this Goshala is

A/B/C/D/E

Deputy Commissioner of Animal Husbandry,

District:

Signature and Seal of Inspecting officer

अभिप्रायः